**<u>महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६</u>**
खाजगी वन जमीनींना देण्यात आलेल्या
अकृषिक परवानग्यांबाबत.....

**महाराष्ट्र शासन,**
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : एनएपी-३४०८/१२०३/प्र.क्र.६६/ ल-५
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १८ मार्च, २००९

संदर्भः-प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१२/जमिन/३/पुणे/म्युटेशन/ ५१८ / ०८-०९ दिनांक १०/१०/२००८

## <u>परिपत्रक</u>

महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अंतर्गत विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार अकृषिक परवानगी जिल्हाधिकारी यांचेकडून देण्यात येते. अकृषिक परवानगी देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम ४४ अंतर्गत विविध खात्यांचे "ना-हरकत" दाखले प्राप्त करुन घेऊन अकृषिक परवानगी दिली जाते. तथापि, पुणे जिल्हयात उपविभागीय अधिकारी, मावळ उपविभाग, पुणे यांनी काही प्रकरणात केंद्र शासनाची पूर्वपरवानगी न घेता महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ मधील कलम २२ (अ) अंतर्गत जमीन पुनःस्थापित करण्याचे आदेश पारित केलेले आहेत. अशा रितीने पुनःस्थापित करण्यात आलेल्या जमिनींपैकी काही जमिनीवर अकृषिक परवानगी घेऊन व बांधकामाच्या परवानग्या घेऊन बांधकामेही सुरु झाल्याचे निष्पन्न झाले आहे असे प्रधान मुख्य वनसंरक्षक, नागपूर यांनी शासनाच्या निदर्शनास आणून दिले आहे.

२. महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम १९७५ मधील कलम २२ (अ) अंतर्गत जमिनी पुनःस्थापित करण्याचे आदेश दिनांक २५ ऑक्टोबर १९८० नंतर पारित करताना राज्य शासनामार्फत केंद्र शासनाची पूर्वपरवानगी घेणे अनिवार्य आहे. तसेच कलम २२(अ) अंतर्गत पुनःस्थापित करण्यात आलेल्या जमिनीचा वनेत्तर कामासाठी वापर अनुज्ञेय नाही. अशा परिस्थितीत या जमिनींना देण्यात आलेल्या अकृषिक परवानग्या व बांधकाम परवानग्या अवैध ठरतात, व अशा परवानग्या दिल्यामुळे वनसंवर्धन अधिनियम १९८० च्या तरतुदींचा भंग होतो. अशाच प्रकारची प्रकरणे इतर जिल्ह्यातही असण्याची शक्यता नाकारता येत नाही.

३. यास्तव शासन असा आदेश देत आहे की, राज्य शासनामार्फत केंद्र शासनाची पूर्वपरवानगी न घेता, महाराष्ट्र खाजगी वने (संपादन) अधिनियम, १९७५ च्या कलम २२ (अ) च्या तरतुदीनुसार ज्या जमिनी पुनःस्थापित करण्यात आलेल्या आहेत अशा पुणे जिल्हयातील व राज्यातील इतर जिल्ह्यातील जमिनींना देण्यात आलेल्या अकृषिक परवानग्यांचा शोध घेऊन अशी सर्व प्रकरणे रद्द करण्याच्या दृष्टीने पुनर्विलोकनात घेऊन त्यावर महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ मधील तरतुदीनुसार तात्काळ कार्यवाही सुरु करावी.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
आवक नं.:- RB/9
ROTA 21 MAR 2009 (20-3-09)
308L

(छ.भा.प.

31 MAR 2009

४. अशा सर्व प्रकरणात देण्यात आलेल्या बांधकाम परवानग्या रद्द करण्याबाबत संबंधीत स्थानिक स्वराज्य संस्थांना जिल्हाधिकारी यांचे स्तरावरुन तात्काळ कळविण्यात यावे.

५. हे परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेतांक 200903181555737001 असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दि.म.खरात)
कार्यासन अधिकारी
महसूल व वन विभाग

प्रती,
१) सर्व विभागीय आयुक्त (प्रत्येकी ०५ प्रतीत),
२) सर्व जिल्हाधिकारी (प्रत्येकी १५ प्रतीत)
३) ग्रामविकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.(२ प्रती)
४) नगरविकास विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. (२ प्रती)
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर (१५ प्रती)
६) वेब को-ऑर्डीनेटर, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई. (१ प्रत)
७) निवड नस्ती, ल-५ कार्यासन, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

प्रत माहितीसाठी अग्रेषित.

१) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (१ प्रत)
२) अपर मुख्य सचिव (वने), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई (१ प्रत)

H 3115-13